# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ३०.११.२०१८

## <u>पोलीस पोलीसांनी काढली रस्ता सुरक्षा रॅली</u>

रस्ता सुरक्षा अभियानाचे औचित्य साधुन मा. प्रभारी पोलीस अधीक्षक श्री महेंद्र पंडित, अपर पोलीस अधीक्षक (नक्षल) श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग आणि उप विभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल ढुमे यांच्या मागदर्शनात आज सकाळी १०.३० वा. चे सुमारास पोलीस स्टेशन गडचिरोली पासुन शहरातील विविध प्रमुख मार्गाने रस्ता सुरक्षा रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर रॅलीत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री भुयार , पोलीस निरीक्षक श्री दिपरतन गायकवाड, मपोउपनि लक्ष्मीछाया तांबुसकर यांचे सह पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि विदयाभारती कन्या शाळेचे शिक्षकवृंद, विदयार्थीनी तसेच काळी पिवळी टॅक्सी, ॲटो चालक, मालक सहभागी झाले होते. रॅली दरम्यान वाहतुकीचे नियमाबाबत घोषणा व बॅनर द्वारे जन जागृती करण्यात आली. या प्रसंगी दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करणे, चारचाकी वाहनात सिटबेल्टचा वापर करणे, दारु पिवुन वाहन न चालविणे, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर न करणे, अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास प्रतिबंध करणे तसेच वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

